नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २३५ | Issue - 235 | वार शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ | Blow- Saturday Date 11 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## संभलमधील स्थिती 'जैसे थे'

### न्यायालयाचा आदेश; विहिरीबाबत कार्यवाही करण्यास मज्जाव

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : संभल जामा मशिदीच्या प्रवेशद्वाराजवळील खासगी विहिरीच्या वादाविषयी सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी 'जैसे थे' स्थिती राखण्याचा आदेश दिला आहे. तसेच, मशीद व्यवस्थापन समितीने केलेल्या याचिकेवर नोटीस बजावली आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संजय कुमार यांच्या खंडपीठाने सांगितले, की सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय विहिरीबाबत कुठलेही पाऊल उचलण्यात येऊ नये. तसेच, प्रशासनाला आताच्या स्थितीबाबत दोन



आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आ- हेत. याप्रकरणी मशीद व्यवस्थापन समितीने याचिका दाखल केली आहे. संभल सत्र न्यायालयाने १९ नोव्हेंबर २०२४ रोजी मशिदीचा सर्व्हे करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक करण्याची पर- वानगी दिली होती. त्याला मशिदीच्या व्यवस्थापन समितीने आव्हान दिले होते.

व्यवस्थापन समितीची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील हुजेफा अहमदी यांनी विहिरीचे ऐतिहासिक महत्त्व न्यायालयात सांगितले. तसेच, या ठिकाणी 'हरि मंदिर' असल्याच्या संदर्भाने दिलेल्या नोटिशीवर चिंता व्यक्त केली.

## देवेंद्र फडणवीसांनी आता नरेंद्र मोदींचे वारसदार व्हावे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



चंद्रपूर : कर्मवीर मारोतराव कन्नमवार यांची आज १२५ वी जयंती आहे. त्या निमित्ताने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. मारोतराव कन्नमवार यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजक भाजपाचे आमदार किशोर जोरगेवार हे होते. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह आदी महत्वाचे नेते उपस्थित होते. मात्र, या कार्यक्रमात भाजपाचे नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत मोठं विधान केलं. 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही सुद्धा आता नरेंद्र मोदींचं वारसदार व्हावं', असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं. त्यांच्या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

### वडेट्टीवारांच्या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा

खरं तर त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय वारसदार म्हणून आम्ही कर्मवीर मारोतराव कन्नमवार यांच्याकडे पाहायचो आणि ते नंतर मुख्यमंत्री देखील झाले. आता आम्ही तुमच्याकडे कर्तुत्व आहे, कार्य करण्याची क्षमता आणि हिमंत आहे. त्यामुळे आता तुम्ही (देवेंद्र फडणवीस) सुद्धा नरेंद्र मोदी यांचं वारसदार व्हावं. स्वभाविक आहे. त्यात काही वेगळं नाही, असं विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूरच्या कार्यक्रमात बोलताना म्हटलं.

भाजपाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्याबाबत बोलताना विजय वडेट्टीवार यांनी जोरदार टोलेबाजी केली. विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं की, किशोर जोरगेवार यांनी या दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी जो प्रस्ताव मांडला त्याला मी अनुमोदनही देतो. खरं तर तुम्ही बाजुची खुर्ची घेण्यास फार पटाईत आहात. राजकारणात हे कौशल्य, काही गोष्टी ज्युनिअरकडून सिनिअरला शिकावं लागतं. ते मी किशोर जोरगेवार यांच्याकडून येथे आल्यापासून शिकलो, अशी टोलेबाजी विजय वडेट्टीवार यांनी केली. या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला माहिती आहे की चंद्रपूर हा जिल्हा वाघ आणि 'वारां'चा जिल्हा आहे. सुधीर मुनगंटीवार हे आमचे नेते आहेत, तसेच विजय वडेट्टीवार आणि किशोर जोरगेवार हे आमचे मित्र आहेत. त्यामुळे मी सांगतो की कुठलेही 'वार' असले तरी आम्ही त्यांचा सन्मान करतो. कारण आम्ही हेडगेवारांचे अनुयायी आहोत. त्यामुळे 'वार' हे आडनाव आल्याबरोबर आमचे हात नेहमी पुढे असतात, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी मुनगंटीवार, वडेट्टीवार यांच्या नावाचा उल्लेख केला.

## सर्वसामान्यांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अधिक सकारात्मक, आश्वासक झाला पाहिजे : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात पहाटेच्या शपथविधीचा उल्लेख करत असं काहीसं वक्तव्य केलं उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. नागपूर या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एक मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केलं. दिवंगत विलासजी फडणवीस यांच्या जयंती निमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पहाटेच्या शपथविधीची आठवण करुन देत देवेंद्र फडणवीस यांनी एक खास वक्तव्य केलं.

संयम, सहनशीलता याची अपूर्व देणगी मला राजकारणातून मिळाली. राजकारणात आल्यानंतर तुम्हाला वाटेल तसे, वेळ प्रसंगी अपशब्दही सहन करावे लागतात. गत पाच वर्षात काहींनी अनेक पद्धतीने मला अपमानित करण्याचा प्रयत्न केला. यात माझ्या कुटुंबाच्याही वाट्याला बरंच काही आलं. ही सहनशक्ती, संयम, एका अर्थाने स्थितप्रज्ञता मी आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कडून शिकलो असं प्रतिपादन देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

विद्यार्थी चळवळीत असतांना मला राजकारणात येण्याची अजिबात इच्छा नव्हती. एक स्वयंसेवक म्हणून आपल्या परिने समाजाला योगदान द्यायचं हे मी निश्चित केलेले होते. स्वयंसेवकाला जे सांगितलं ते त्यानं करायचं असतं असं विलासजी फडणवीस यांनी सांगितलं, ज्यामुळे माझ्यापुढे काहीही पर्यायच त्यांनी ठेवला नाही, राजकारणात सहनशक्तीचा कस लागतो. समाजात जे काही चांगले दिसलं तर मी त्यापासून शिकत आलो आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीकोनातून जे प्रकल्प हाती घेतले ते त्याच शिकवणुकीतून मी पूर्ण करत आलो. स्वर्गिय विलासजी फडणवीस यांच्यातील उपक्रमशिलतेचा गुण मी अंगिकारला असे सांगून त्यांनी त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कॅन्सर इन्स्टिट्युट पासून इतर संस्था या समाजाला योगदान देणाऱ्या अशा व्यक्तींप्रतिची एक कृतज्ञता असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

महाराष्ट्राची राजकीय संस्कृती ही आपण आणली पाहिजे. सर्वसामान्यांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अधिक सकारात्मक, आश्वासक झाला पाहिजे यादृष्टीने मी आता मुख्यमंत्री झाल्यानंतर अगोदर हे जाहीर केले आहे . कोणत्याही खोट्या आरोपातून केलेल्या नकारात्मक वातावरणाला आता समाज मान्यता देत नाही हे या निवडणुकीतून सिद्ध झालं आहे. एका दृष्टीने कलुषित झालेल्या राजकारणाला लोकांनीच शुद्ध करण्याकरीता घेतलेला हा पुढाकार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राजकारणात कोणीही कायमचे शत्रू नसतात. राजकारणात काहीही होऊ शकते. सकाळचा शपथविधी नको म्हणून यावेळी आम्ही सायंकाळी शपथविधी ठेवला असं एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी सांगितल्यावर सभागृहात हशा पिकला.

## तिसरीत शिकणाऱ्या मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिवसेंदिवस आरोग्य विषयक समस्य गंभीर बनत चालल्या आहेत. आता पौढांबरोबरच लहान मुलांमध्ये देखील हृदयविकाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. हृदयविकाराच्या झटक्याने लहान मुलांचा मृत्यू होण्याच्या प्रकरणांमध्ये आणखी एकाची भर पडली आहे. गुजरातच्या अहमदाबादमध्ये समोर आलेल्या या घटनेत इयत्ता ३ मध्ये शिकणाऱ्या आठ वर्षांच्या मुलीचा शुक्रवारी तिच्या शाळेत मृत्यू झाला आहे. तिचा मृत्यू हृदय विकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगितले जात आहे. पीटीआयने अधिकाऱ्यांच्या हवाल्याने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या मुलीचे नाव गार्गी रानपारा असून ती सकाळी थलतेज भागात असलेल्या झेबर स्कूल फॉर चिल्ड्रनमध्ये कोसळली. दरम्यान या मुलीच्या मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. सकाळी आपल्या वर्गाकडे जात असताना लॉबीमधील खुर्चीवर बसल्याबरोबर ती मुलगी बेशुद्ध पडली, अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका शर्मिष्ठा सिन्हा यांच्या हवाल्याने पीटीआयने दिली आहे.

## रिकामी तिजोरी भरण्यासाठी सरकार कर वाढवण्याच्या तयारीत

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेसह अनेक कल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्या आहेत. याचा परिणाम राज्याच्या तिजोरीवर होणे स्वाभाविक आहे. राज्याच्या तिजोरीवरील ताण कमी करण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील मद्य प्रेमींवर येण्याची शक्यता आहे. कारण राज्य सरकारकडून तिजोरीवरील भार कमी करण्यासाठी काही उपाय शोधले जात आहेत. याचाच भाग म्हणून राज्यातील महायुती सरकार येत्या काही दिवसात मद्य आणि सिगारेट यांच्यावरील कर वाढवण्याची शक्यता आहे.

महसूलाच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढवण्यासाठी नवे मार्ग शोधण्यासाठी राज्य सरकारने पाच सदस्यांची समिती स्थापन केली आहे. या समितीकडून महसूल मिळवण्याचा नवीन मार्ग म्हणून मद्य उत्पादन आणि विक्रीच्या शक्यतेचा अभ्यास केला जाणार आहे.

ही समिती गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली महसूल वाढवण्यासाठीच्या मद्य धोरणाच्या अभ्यास काम करणार आहे. तसेच या समितीत वित्त आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, राज्य जीएसटी आयुक्त आणि उत्पादन शुल्क आयुक्त या समितीचे सदस्य असतील. या सर्वांना एकत्रितपणे मद्य उत्पादन, मद्य विक्री परवाने, उत्पादन शुल्क आणि इतर राज्यांनी अवलंबलेल्या महसूल वाढवण्याच्या पद्धती आणि धोरणांचा अभ्यास करण्याचे काम सोपवले जाईल. या समितीकडून राज्याचे महसुली उत्पन्न वाढवण्यासाठीच्या उपायांवर शिफारसी अपेक्षित आहेत. याबरोबरच राज्य सरकार अवैध मद्य विक्री बंद करणे आणि जास्तीत जास्त मद्य विक्री परवाने वितरीत करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे.



## निर्णय न घेण्याची राज्यपालांची भूमिका खेदजनक, उच्च न्यायालयाची टिप्पणी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



मुंबई : विधान परिषदेवरील राज्यपाल नामनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीच्या मुद्याप्रकरणी शिवसेनेच्या (ठाकरे गट) नेत्याने केलेली याचिका फेटाळताना तत्कालिन सरकारने पाठवलेल्या शिफारशींच्या यादीवर आदेश देऊनही निर्णय न घेण्याची राज्यपालांची भूमिका खेदजनक असल्याची टिप्पणी उच्च न्यायालयाने केली. त्याचवेळी, राज्यपालांच्या या भूमिकेमुळे नंतरच्या सरकारचा ही यादी परत मागवण्याचा निर्णय कायद्याच्या चौकटीतच होता, असेही न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

### राज्यपाल नामनिर्देशित आमदारांच्या नियुक्तीचे प्रकरण

महाविकास आघाडी (मविआ) सरकारने शिफारस केलेल्या राज्यपाल नामनिर्देशित १२ आमदारांची नावे मागे घेण्याच्या माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ५ सप्टेंबर २०२२ रोजी घेतलेल्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने गुरुवारी फेटाळली होती. न्यायालयाच्या सविस्तर आदेशाची प्रत शुक्रवारी उपलब्ध झाली. त्यात, न्यायालयाने राज्यपालांच्या भूमिकेबाबत उपरोक्त टिप्पणी केली.

तत्कालीन मंत्रिमंडळाने ६ नोव्हेंबर २०२० रोजी राज्यपालांकडे आमदार नियुक्तीच्या शिफारशींची यादी पाठवली होती. परंतु, तत्कालिन राज्यपालांनी त्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. त्यानंतर, उच्च न्यायालयाने १३ ऑगस्ट २०२१ रोजी यासंदर्भातील जनहित याचिकेवर निकाल देताना राज्यपाल अमर्यादित काळापर्यंत यादीवर निर्णय प्रलंबित ठेवू शकत नसल्याचे म्हटले होते. असे असताना ६ नोव्हेंबर २०२० रोजी पाठवण्यात आलेल्या यादीवर राज्यपालांनी निर्णय न घेणे हे खूपच खेदजनक असल्याचे मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आदेशात म्हटले आहे. त्याचवेळी, राज्यपालांनी तत्कालिन सरकारने पाठवलेल्या नावांच्या शिफारशीच्या यादीवर काहीच निर्णय घेतला नाही. परिणामी, त्याबाबतची प्रक्रिया कायद्यानुसार अंतिम टप्प्यात पोहोचलीच नाही. अशा स्थितीत आधीच्या सरकारने पाठवलेली यादी नव्या सरकारला मागवण्याचा कायद्याने अधिकार आहे. त्यामुळे, ठाकरे सरकारने पाठवलेली आमदारांच्या शिफारशींची यादी शिंदे सरकारने परत मागण्याचा निर्णय कायद्यानुसार होता, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादातील विरोधाभासांकडेही आदेशात लक्ष वेधले, राज्यपालांनी २०२० च्या शिफारशींबाबत आपला विवेक वापरायला हवा होता, असा युक्तिवाद एकीकडे याचिकाकर्त्यांने केला. दुसरीकडे, यादी मागे घेणे बेकायदेशीर असल्याचेही म्हटल्यावर न्यायालयाने बोट ठेवले.

### डॉलरमागे ८६ च्या गर्तेत गेलेल्या रुपयातून मोठी चिंता


### रुपयाच्या निरंतर गटांगळीचा हा सलग १० वा आठवडा

## परकीय चलन गंगाजळीला अब्जावधी डॉलरचा फटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईः अमेरिकी चलनाची वाढती मजबुती आणि परदेशी गुंतवणुकीचे मोठ्या प्रमाणात देशाबाहेर सुरू असलेल्या गमनापुढे रुपयाचा प्रतिकार अपयशी ठरला असून, शुक्रवारच्या सत्रात रुपया आणखी १८ पैशांनी घसरला आणि इतिहासात पहिल्यांदाच त्याने डॉलरच्या तुलनेत ८६.०४चा टप्पा गाठला. चिंतेची बाब म्हणजे रुपयाच्या निरंतर गटांगळीचा हा सलग १० वा आठवडा असून, यातून रिझर्व्ह बँकेकडील परकीय गंगाजळीही वेगाने आटत चालली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर खनिज तेलाच्या वाढत्या किमती आणि देशांतर्गत शेअर बाजारातील नकारात्मकता याचाही स्थानिक चलनाच्या मूल्यावर विपरीत परिणाम दिसून आला. येत्या २० जानेवारीला डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे विधिवत हाती घेतील आणि नवीन प्रशासनाकडून व्यापाराला प्रतिबंधात्मक उपाययोजना योजल्या जाण्याच्या भीतीने देशातही डॉलरची मागणी वाढत असून, जी पर्यायाने अमेरिकी चलनाच्या भक्कमतेस, तर रुपयाच्या दुर्बलतेस कारण ठरत आहे, असे चलन बाजारातील व्यापाऱ्यांनी सूचित केले.



आंतरबँक परकीय चलन विनिमयात, शुक्रवारी रुपयाचे ८५.८८ पातळीवर व्यवहार खुले झाले, ८५.८५ असा उच्चांकही त्याने गाठला. मात्र नंतर तेथून गडगडत ८६.०४ या आजवरच्या सर्वात नीचांक पातळीवर तो रोडावला. दिवसअखेर मागील बंद पातळीच्या तुलनेत त्यात १८ पैशांनी घसरण झाली. गुरुवारी देखील रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ५ पैशांनी वाढून ८५.८६ वर स्थिरावला होता, बुधवारच्या सत्रात मात्र चलनात १७ पैशांची तीव्र घसरगुंडी दिसली होती.

नवनवीन नीचांकपद गाठत असलेल्या स्थानिक चलनाचा भारताच्या परकीय चलन गंगाजळीला मोठा फटका बसत असून, ३ जानेवारीला समाप्त आठवड्यात ती ५.६९३ अब्ज डॉलरने घसरून, ६३४.५८५ अब्ज डॉलरवर उतरली, असे रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी स्पष्ट केले. आधीच्या आठवड्यातही परकीय चलन साठा ४.११२ अब्ज डॉलरने घटून ६४०.२७९ अब्ज डॉलरपर्यंत खालावला होता.


गेल्या काही आठवड्यांपासून परकीय चलन साठ्यात निरंतर घट सुरू आहे आणि रुपयातील अस्थिरता कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून चलन बाजारात सुरू राहिलेल्या हस्तक्षेपातून ही घसरण वाढत आहे. सप्टेंबरअखेर मध्यवर्ती बँकेकडील परकीय चलन साठा ७०४.८८५ अब्ज डॉलरच्या सार्वकालिक उच्चांकावर होता, त्या पातळीवरून तो तीन महिन्यांत ७० अब्ज डॉलरहून अधिक गडगडला आहे. गंगाजळीतून डॉलर उपसला जाणे सुरू आहे, बरोबरीनेच युरो, पौंड आणि येन सारख्या गैर-अमेरिकी चलनांचे मधल्या काळात झालेले अवमूल्यन हे एकूण चलन मालमत्तेच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले आहे. गंगाजळीतील सुवर्ण साठा मात्र गेल्या आठवड्यात वाढून ६७.०९२ अब्ज अमेरिकी डॉलरवर पोहोचला आहे.

## संपादकीय....

### तीव्र घसरण

नवनवीन नीचांकपद गाठत असलेल्या स्थानिक चलनाचा भारताच्या परकीय चलन गंगाजळीला मोठा फटका बसत असून, ३ जानेवारीला समाप्त आठवड्यात ती ५.६९३ अब्ज डॉलरने घसरून, ६३४.५८५ अब्ज डॉलरवर उतरली, असे रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी स्पष्ट केले. आधीच्या आठवड्यातही परकीय चलन साठा ४.११२ अब्ज डॉलरने घटून ६४०.२७९ अब्ज डॉलरपर्यंत खालावला होता. गेल्या काही आठवड्यांपासून परकीय चलन साठ्यात निरंतर घट सुरू आहे आणि रुपयातील अस्थिरता कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून चलन बाजारात सुरू राहिलेल्या हस्तक्षेपातून ही घसरण वाढत आहे. सप्टेंबरअखेर मध्यवर्ती बँकेकडील परकीय चलन साठा ७०४.८८५ अब्ज डॉलरच्या सार्वकालिक उच्चांकावर होता, त्या पातळीवरून तो तीन महिन्यांत ७० अब्ज डॉलरहून अधिक गडगडला आहे. गंगाजळीतून डॉलर उपसला जाणे सुरू आहे, बरोबरीनेच युरो, पौंड आणि येन सारख्या गैर-अमेरिकी चलनांचे मधल्या काळात झालेले अवमूल्यन हे एकूण चलन मालमत्तेच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले आहे. गंगाजळीतील सुवर्ण साठा मात्र गेल्या आठवड्यात वाढून ६७.०९२ अब्ज अमेरिकी डॉलरवर पोहोचला आहे. अमेरिकी चलनाची वाढती मजबुती आणि परदेशी गुंतवणुकीचे मोठ्या प्रमाणात देशाबाहेर सुरू असलेल्या गमनापुढे रुपयाचा प्रतिकार अपयशी ठरला असून, शुक्रवारच्या सत्रात रुपया आणखी १८ पैशांनी घसरला आणि इतिहासात पहिल्यांदाच त्याने डॉलरच्या तुलनेत ८६.०४चा टप्पा गाठला. चिंतेची बाब म्हणजे रुपयाच्या निरंतर गटांगळीचा हा सलग १० वा आठवडा असून, यातून रिझर्व्ह बँकेकडील परकीय गंगाजळीही वेगाने आटत चालली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर खनिज तेलाच्या वाढत्या किमती आणि देशांतर्गत शेअर बाजारातील नकारात्मकता याचाही स्थानिक चलनाच्या मूल्यावर विपरीत परिणाम दिसून आला. येत्या २० जानेवारीला डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे विधिवत हाती घेतील आणि नवीन प्रशासनाकडून व्यापाराला प्रतिबंधात्मक उपाययोजना योजल्या जाण्याच्या भीतीने देशातही डॉलरची मागणी वाढत असून, जी पर्यायाने अमेरिकी चलनाच्या भक्कमतेस, तर रुपयाच्या दुर्बलतेस कारण ठरत आहे, असे चलन बाजारातील व्यापाऱ्यांनी सूचित केले. आंतरबँक परकीय चलन विनिमयात, शुक्रवारी रुपयाचे ८५.८८ पातळीवर व्यवहार खुले झाले, ८५.८५ असा उच्चांकही त्याने गाठला. मात्र नंतर तेथून गडगडत ८६.०४ या आजवरच्या सर्वात नीचांक पातळीवर तो रोडावला. दिवसअखेर मागील बंद पातळीच्या तुलनेत त्यात १८ पैशांनी घसरण झाली. गुरुवारी देखील रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ५ पैशांनी वाढून ८५.८६ वर स्थिरावला होता, बुधवारच्या सत्रात मात्र चलनात १७ पैशांची तीव्र घसरगुंडी दिसली होती.

# एचएमपीव्ही विषाणुबाबत धाराशिव आरोग्य यंत्रणा सज्ज



## आरोग्य विभागाकडून नागरिकांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव (जिमाका) : सध्या चीनमध्ये Human Metapneumovinis ( HPMY ) एच.पी.एम.वाय विषाणूचा उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे.आरोग्य यंत्रणेकडून नागरिकांना काय करावे आणि काय करू नये याबाबत आवाहनही करण्यात आले आहे. मानवी मेटान्यूमोव्हायरस ( एचएमपीटी ) हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे.ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या कारणीभूत ठरते.हा एक हंगामी रोग आहे,जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो.या अनुषंगाने डीजीएचएस आणि संचालक,एन सी डी सी.दिल्ली यांनी ३ जानेवारी २०२५ रोजी एक निवेदन प्रसिध्द केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. तथापी खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

**हे करा** : जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका .साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणापासून दूर राहा.भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन ( व्हेंटीलेशन ) होईल याची दक्षता घ्या .

**हे करू नये** : हस्तांदोलन,टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर,आजारी लोकांशी जवळचा संपर्क,डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे,डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे. चीनमधून आलेल्या नवीन विषाणू Human Metapneumovirus (HMPV) बाबत चिंतेचे कारण नाही,परंतु काळजी घेणे गरजेचे आहे.याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भितीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नाही.असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एस.एल.हरिदास यांनी केले आहे.

# स्वेरीच्या आठ प्राध्यापकांचा अभ्यास दौरा; हैद्राबाद येथील प्रयोगशाळांना भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील ८ प्राध्यापकांनी दि.१६ आणि दि.१७ डिसेंबर २०२४ रोजी या दोन दिवशी हैद्राबाद येथील दोन प्रसिद्ध नवोपक्रम केंद्रांना भेट दिली. स्वेरी मध्ये अत्याधुनिक इनक्युबेशन सेंटर स्थापन करणे आणि मायक्रोफ्लुइडिक संशोधनाचा विकास करणे या महत्वाच्या दोन कारणासाठी हा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला केला. या दौऱ्यातून स्वेरीच्या प्राध्यापकांनी अतिशय महत्वाची माहिती जाणून घेतली जी भविष्यात स्वेरीतील विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली,उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने आयोजिलेल्या या दोन दिवशीय अभ्यास दौऱ्यात संशोधन अधिष्ठाता डॉ. ए. पी. केने,प्रा. डी. डी. रोंगे,प्रा. ए. के. पारखे,प्रा. एस. आर. गवळी,प्रा. एस. एम. काळे,प्रा. यु. एल. अनुसे,प्रा. व्ही. आर. चव्हाण व डॉ. एन. यू. कौटकर या आठ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. दि.१६ डिसेंबर रोजी सदरच्या ८ तज्ञ प्राध्यापकांनी आयआयटी हैदराबादच्या'तंत्रज्ञान इनक्युबेशन सेंटर (आयटीआयसी)'ला भेट देवून तेथील माहिती जाणून घेतली. डीप-टेक स्टार्टअप्सना सहाय्य करणारे हे एक अग्रगण्य केंद्र आहे.

१.५ लाख चौरस फूट परिसर असलेल्या आयटीआयसीने आयडेक्स,टिहान आणि निधी यांसारख्या प्रतिष्ठित कार्यक्रमांमधून निधी मिळवून १९२ पेक्षा जास्त स्टार्टअप्स ना ऊर्जा देण्याचे कार्य केले आहे. व्यवस्थापक रोहित ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, आयटीआयसी ची धोरणे, कार्यपद्धती आणि सुविधा यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या संवादातून पंढरपुरात आयटीआयसीसारखे यशस्वी मॉडेल तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. त्यानंतरच्या दिवशी दि. १७ डिसेंबर रोजी या पथकाने बिट्स पिलानी,हैदराबाद येथील एमईएमएस,मायक्रोफ्लुइडिक्स आणि नॅनोइलेक्ट्रॉनिक्स (एमएमएनई) लॅबला भेट दिली. या लॅबचे नेतृत्व बिट्सच्या सर्व कॅम्पसचे डीन आर अँड डी डॉ. संकेत गोयल यांनी केले.

संचालक यूव्ही लेझर रायटर,रमन स्पेक्ट्रोमीटर आणि मायक्रोफ्लुइडिक ड्रॉपलेट ज नरेटर यांसारख्या अत्याधुनिक उपकरणांची माहिती त्यांनी दिली. मायक्रोफ्लुइडिक तंत्रज्ञान आणि उद्योग व शिक्षण व्यवस्था यांच्यातील सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. या दौऱ्यांतून अटल कम्युनिटी आणि इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) अंतर्गत इनक्युबेशन सेंटर संदर्भात उपयुक्त माहिती मिळाली असून संशोधन सुविधांच्या मजबुतीसाठी ही प्रेरणा मिळाली आहे. ग्रामीण भागात नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी या माहितीचा उपयोग केला जाणार आहे.

या अभ्यास दौऱ्याचा फायदा स्वेरीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर बाबत होणार असून हा अभ्यासदौरा स्वेरीच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानला जात आहे.

डॉ. ए. पी. केने,कंपनीचे व्यवस्थापक रोहित ठाकूर प्रा. व्ही. आर. चव्हाण,प्रा. डी. डी. रोंगे,प्रा. ए. के. पारखे,दुसरे छायाचित्र'बिट्स पिलानी'कंपनीत भेट दिल्यावर तेथील अधिकाऱ्यांनी स्वेरीच्या प्राध्यापकांचे स्वागत केले.

# बाबा ग्रुप फाऊंडेशनने वर्धापन दिनानिमित्त आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या चौथ्या वर्धापदिनानिमित्त ५ जानेवारी २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील लोनाड येथे आरोग्य तपासणी शिबिर घेऊन बाबा ग्रुप फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली आहे. सदर आरोग्य शिबिरात एक्स-रे, चष्मे, मेडिसिन , बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या तर्फे मोफत देण्यात आले असून



२२५ नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी उपस्थित पाहुण्यांनी बाबा ग्रुप फाउंडेशनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. एपेक्स हॉस्पिटल्स मुलुंड ,ए. एस. जी नेत्र रुग्णालय कल्याण यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी बाबा ग्रुप फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव,उपाध्यक्ष सागर गायकवाड , सचिव अनिकेत दोंदे,खजिनदार हरेश जाधव, सदस्य विकास धनगर, जाधव, अजय जाधव , प्रवेश खलिफा,ऋतिक जाधव , साज खलिफा,आदित्य जाधव,निलेश कुंभार यांनी मेहनत घेतली.

# यादव गायकवाड 'राष्ट्रीय कर्मयोगी' पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी/वसमत : पांगरा शिंदे येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षक असणाऱ्या श्री यादव गायकवाड यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार या सन्मानाने सन्मानित करण्यात आले.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पांगरा शिंदे येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या श्री यादव गायकवाड यांनी शिक्षण क्षेत्रात उच्च शैक्षणिक पात्रता धारण केली आहे. त्यांनी मराठी,इतिहास,राज्यशास्त्र, अर्थशास्त्र,समाजशास्त्र,शिक्षणशास्त्र या सहा विषयात पदव्युत्तर पदवी (एम.ए.) केले आहे.प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणाऱ्या सेट,नेट सारख्या नऊ पात्रता परीक्षा त्यांनी उतिर्न केल्या आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या जर्नल मध्ये त्यांचे अनेख शोध पेपर प्रकाशित झाले आहेत, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे त्यांचे पी.एच.डी.साठीचे संशोधन चालू आहे.प्राथमिक शिक्षक असणाऱ्या श्री गायकवाड यांनी अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन एक आनंददायी प्रक्रिया करून व विद्यार्थी विकासाचे विविध उपक्रम राबविले आहेत. त्याचा परिणाम त्यांचे अनेक विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षा यशस्वी झाले आहेत.संविधान गौरव परीक्षा,रांगोळी स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा,क्रीडा स्पर्धा यासारख्या स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झगडणाऱ्या या उच्च शिक्षित शिक्षकाच्या कार्याची दखल घेऊन दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार जाहीर केला. ५ जानेवारी २०२५ रोजी नाशिक येथे मराठा प्रसारक समाज संस्थेच्या




होराझान अॅकेडमी च्या सभागृहात डॉ महेंद्र देशपांडे राष्ट्रीय अध्यक्ष बाळशास्त्री पत्रकार संघ, गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या अध्यक्षा डॉ भारती चव्हाण ,मॉडेल व मिस मलेशिया इंटरनॅशनल डॉ ज्योती केदारे यासारख्या विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

# स्पर्धा परीक्षा विशेष मार्गदर्शन ८४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५ जानेवारी २०२५ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात ८४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना अर्थशास्त्रीय संशोधक शिवम गायकवाड म्हणाले की, केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय पदे भरण्यासाठी प्रक्रिया राबविली जाते. पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखती द्वारे सक्षम उमेदवराची निवड केली जाते. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत ३६ वेगवेगळ्या प्रकारच्या पदासाठी परीक्षा घेतली जात असते. आयएएस म्हणजे भारतीय प्रशासकीय सेवा हे त्यातील सर्वोच्च पद आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाणारी युपीएससीची परीक्षा ही जगातील तिसऱ्या तर भारतातील पहिल्या क्रमांकाची सर्वोच्च कठीण परीक्षा आहे. या परीक्षेत निवड होण्यासाठी विविध विषयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे कारण या पदावरील व्यक्तींचा सर्व क्षेत्रातील व्यक्तींशी संबंध येत असतो. पूर्व आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मुलाखतीत पास होण्यासाठी जास्तीत जास्त सराव असण्याची गरज आहे. त्यातून मुलाखत देणाऱ्या उमेदवाराचा धर्मनिरपेक्ष स्वभाव तपासला जातो. यात निवड झालेल्यांना डेहराडून येथील लबासना तर्फे प्रशिक्षण दिले जाते.

याप्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, स्पर्धा परीक्षेतून अनेक उच्च पदस्थ अधिकारी निर्माण झालेत पण ते फार काही समाजाच्या उपयोगात आले नाहीत. समाजात संकुचित विचार सर्वोच्च स्थानी आहे, ही शोकांतिकाच होय. टी. एन. थोरात म्हणाले की, आंबेडकरवादी मिशनचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी संचालक बी. बी. मेश्राम यांच्या सारखे सर्वांनी कार्य केले पाहिजे. धनराज गोंडाणे म्हणाले की, ज्या समाजात राहतो त्या समाजाचा उद्धार करणे हे आपले कर्तव्य आहे. करिता सामाजिक बांधिलकीच्या भावनेने गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य केले पाहिजे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, शिक्षणाशिवाय मा-याच्या जागा काबीज करता येणार नाहीत म्हणून भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते तर तलवारीचे तयाच्या न्यारेच टोक असते, याचा गर्भित अर्थ लक्षात घेऊन पुढे गेले पाहिजे.

प्रा. एस. एन. गवई म्हणाले की, जे मोठे होतात ते समाजाकडे वळून पाहत नाही. सुभाष ठोकळ म्हणाले की, न्यायधीश, जिल्हाधिकारी, तहसिलदार यासारख्या जागा या लोक सेवकांच्या जागा आहेत. तर ख-या मा-याच्या जागा राष्ट्रपती, राज्यपाल, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार यासारख्या आहेत. त्याकडे आपले दूर्लक्ष होत आहे. म्हणून आपल्या समाजात राजकीय जागृती होणे आवश्यक आहे.

प्रमुख वक्ते पीईएसआर कॉलेजचे प्राचार्य दिलीप वर्घट म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्या काळात महात्मा फुले यांनी शेकडो लग्न विधी सत्यशोधक पद्धतीने ब्राह्मणाशिवाय पार पाडले होते. त्यामुळे ब्राह्मणांची दक्षिणा बुडाली म्हणून नुकसान भरपाई साठी त्यांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. ज्यात फुले हरले. त्यांनी वरिष्ठ न्यायालयात अपील केली. त्यातही न्यायधीश ब्राह्मण असल्याने 'जातीसाठी माती खावी' याप्रमाणे निकाल दिल्याने ब्राह्मणांचा विजय झाला. पुन्हा सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यात आले तिथे मात्र न्यायधीश ब्रिटिश होते ज्यांनी लग्न न लावणा-यांना, काम नाही तर दाम नाही. या तत्त्वावर फुल्यांच्या बाजूने न्याय दिला यावरून मा-याच्या जागी सक्षम व योग्य व्यक्ती असल्यास काय होते? याचे हे महत्वपूर्ण उदाहरण आहे. म्हणून आपण मा-याच्या जागा काबीज केल्या पाहिजेत. उच्च पदस्थ नौक-या मिळविण्यासाठी शिकवणी वर्ग लावण्याची नेहमीच गरज नसते.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रशासकीय सेवेतील सर्व प्रकारची पदे काबीज करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मात्र आता बदलत्या काळानुसार केवळ पब्लिक सेक्टरवर अवलंबून न राहता प्रायव्हेट सेक्टर मधील एम. डी., सेक्रेटरी, सीईओ, यासारखी पदे सुद्धा काबीज केली पाहिजेत. करिता केवळ युपीएससी, एमपीएससी सारख्या परीक्षा देत असताना आता जग ग्लोबल झाले असल्याने जागतिक पातळीवरील परीक्षा देऊन जागतिक स्तरावरील पदे काबीज केली पाहिजेत. भारतातील ८ टक्के जनतेला संघटित क्षेत्रात नौक-या उपलब्ध असून त्यातील जवळपास ३ टक्के लोकांना शासकीय व ५ टक्के लोकांना खाजगी क्षेत्रातील नौक-या मिळू शकतात. तर मग उर्वरित ९२ टक्के जनतेच्या उदरनिर्वाहाचे काय? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. म्हणून व्यवस्थापनाने त्यांच्या उदरनिर्वाहासाठी योजना राबविल्या पाहिजेत. हे समाज व्यवस्थापक राज्यकर्त्यांचे आद्यकर्तव्य आहे. जेणेकरून समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होऊ शकेल.

३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी १९८१ दरम्यान दिल्ली येथे संपन्न झालेल्या बामसेफच्या प्रशिक्षण शिबिरातील नोंदीप्रमाणे मायावती या युवा शिबिरार्थी होत्या. तेव्हा त्या एम. ए., बी. एड., एलएलबी होत्या. तेव्हा त्यांना जिल्हाधिका-या सारख्या प्रशासकीय सेवेतील मा-याची जागा काबीज करायची होती. परंतु प्रशिक्षण शिबिराचा परिणाम म्हणून राजकीय क्षेत्रात ख-या मा-याच्या जागा असल्याची जाणीव झाल्याने आपले क्षेत्र बदलून घेतले परिणामी पुढे सुश्री मायावती उत्तर प्रदेश सारख्या मोठ्या राज्याच्या त्या मुख्यमंत्री राहिल्या आहेत. हे प्रेरणादायी उदाहरण लक्षात घेऊन शिक्षण घेतल्यावर नौक-या शोधण्यापेक्षा ज्या क्षेत्रात जायचे आहे त्या प्रकारचे आवश्यक शिक्षण घेतले पाहिजे. म्हणजे नौक-यासह व्यवसायात किंवा इतरही क्षेत्रात स्थिरावता येईल. करिता प्राचार्य दिलीप वर्घट यांनी म्हटल्याप्रमाणे शिकवणी वर्ग लावण्याची नेहमीच आवश्यकता नसेल तर गरीब, असहाय, होतकरू विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराप्रमाणे १८-१८ तास अभ्यास केला पाहिजे. करिता फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल युपएससी, एमपीएससीसह इतर सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या प्रामाणिक विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याची भूमिका पार पाडत आहे. तरी संबंधितांनी प्रत्यक्ष संपर्क करावे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रतीक पंचशील व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, गोविंद कांबळे, इंजिनिअर किशोर पाटील, प्रतीक पंचशील, अशोक मेश्राम, धनराज गोंडाणे, जीवक मुजमुले, प्रा. एस. एन. गवई, सुभाष ठोकळ, प्रा. दिलीप वर्घट इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### मार्केट यार्ड येथून दुचाकी पळविली, गुन्हा दाखल

सोलापूर : मार्केट यार्ड येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी आर ९५७८) ही चोरून नेल्याची घटना नऊ जानेवारी रोजी सकाळी दहा ते साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी बलभीम मनोहर गुंड (वय-३७, रा. मु पो येणकी, ता. मोहोळ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल धुमाळ करीत आहेत.

### हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळविली

सोलापूर : जुना कुंभारी नाका प्रकाश हॉटेल येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच २५ जे ९३३६) ही चोरून नेल्याची घटना पाच जानेवारी रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सिद्धप्पा शिवशरणआप्पा कोपनूर (वय-४५ रा.प्लॉट नंबर तीन, स्वागत नगर ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

### बंद घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने पळविले

सोलापूर : सिव्हिल हॉस्पिटल येथून बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत कपाटामधील ५३ हजार रोख रक्कम, २.४ ग्रॅमचे सोन्याचे टॉप्स, ३.३ ग्रॅमचे सोन्याचे कानातील चेन, तीन ग्रॅमचे सोन्याचे मनी मंगळसूत्र असा ऐवज चोरून नेल्याची घटना २८ डिसेंबर ते तीन जानेवारी रोजी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अजय मल्लिकार्जुन दारूलू (वय-४५, रा.४७८ उत्तर सदर बझार, सतनाम चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चव्हाण हे करीत आहेत.

### पूर्व वैमनस्यातून तरुणास मारहाण, गुन्हा दाखल


सोलापूर : गोल्ड जिम समोरील रोडच्या कडेला मागील भांडणाच्या राग मनात धरून मारहाण केल्याची घटना आठ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी रामकृष्ण हरिदास मुंढे (वय २६, रा. घर नंबर दोन ब अभिमानश्री नगर, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून कृष्णादास तुकाराम लोंढे (वय-४२, रा.८५ लक्ष्मी विष्णू चाळ, डोणगाव रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी आणि संशयित आरोपी यांचे सहा महिन्यापूर्वी भांडण झाले होते. त्याच भांडणाचा राग मनात धरून यातील संशयित आरोपीने फिर्यादी बेसावध असताना डाव्या व उजव्या दंडावर वार करून जखमी केले आहे.शिवीगाळ करून दमदाटी केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कटारे हे करीत आहेत.

# उजनी धरणात वाळू माफियांवर मोठी कारवाई

## वाळू उपसा करणाऱ्या सहा बोटी केल्या नष्ट





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे

आज दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी माननीय जिल्हाधिकारी पुणे श्री जितेंद्र डूडी व अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री सुहास मापारी यांच्या मार्गदर्शनाखाली व बारामती उपविभागाचे उपविभागीय अधिकारी श्री वैभव नावडकर यांच्या सूचनेनुसार इंदापूर तालुक्याचे तहसीलदार श्री जीवन बनसोडे व इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री सूर्यकांत कोकणे यांच्या नेतृत्वात महसूल व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने उजनी जलाशयात इंदापूर तालुक्यातील कांदलगाव येथून करमाळा तालुक्याच्या हद्दीपर्यंत पाठलाग करून वाळू माफियांच्या सहा बोटी पकडल्या व त्या सर्व बोटी बुडवून नष्ट केल्या.

सदर कारवाई मध्ये इंदापूरचे निवासी नायब तहसीलदार श्री अविनाश डोईफोडे, इंदापूर मंडळ अधिकारी श्याम झोडगे, माळवाडी मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, इंदापूर ग्राम महसूल अधिकारी अशोक पोळ, ग्राम महसूल अधिकारी कालठण वैभव मुळे, ग्राम महसूल अधिकारी गलांडवाडी नंबर १ भास्कर घोळवे, तरंगवाडी ग्राम महसूल अधिकारी मनीषा पोळ, पडस्थळ ग्राम महसूल अधिकारी राजश्री ढमे, बाभुळगाव ग्राम महसूल अधिकारी वृषाली कारंडे आणि पोलीस कर्मचारी लक्ष्मण सूर्यवंशी व दत्तू जाधव यांनी भाग घेतला.

# श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चरणी ६ लक्ष किंमतीचे सोने-चांदीचे दागिने अर्पण





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस सुमित मोरगे या दानशुर भाविकांकडून ६ लक्ष किंमतीने सोने-चांदी दागिने अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

यामध्ये गोफासह लिंग, बेलपान, मंगळसुत्र, बाजूबंद इत्यादी ८१ ग्रॅम वजनाचे सोने वस्तू तसेच ७५ ग्रॅम वजनाचे चांदीची करंडे / वेढणे जोड वस्तू दान केली आहे. संबंधित भाविक हे नांदेड येथील रहिवाशी असून, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत. त्यांनी यापूर्वी मंदिर समितीस श्री विठ्ठल गाभारा व श्री रूक्मिणी गाभारा येथील मेघडंबरीला चांदी लावून दिलेली आहे.

# बारामतीतील महिला रुग्णालयास सावित्रीबाई फुले यांचे नाव द्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती/प्रतिनिधी : बारामती येथील शासकीय महिला रुग्णालय चालू होऊन बरेच दिवस झालेले आहे व ते रुग्णालय महिलांसाठी वरदान ठरले आहे. सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीचे औचित्य साधून बारामती महिला रुग्णालयास सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे,अनिकेत मोहिते, मन्सूर शेख, निलेश जाधव यांच्या वतीने बारामती तहसीलदार गणेश शिंदे यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन केली आहे.

**बारामती तहसीलदारांना दिले निवेदन**

महिला शासकीय ग्रामिण रुग्णालय बारामती ऐवजी सावित्रीबाई फुले महिला शासकीय ग्रामिण रुग्णालय बारामती असे नामकरण करण्याची मागणी सदर निवेदनात केली आहे.



## कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

पंढरपूर/प्रतिनिधी : सुमारे १४०० विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ सीमाताई परिचारक, तुकाराम आप्पा राऊत,मा. सुभाष माने माजी जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी सुरुवात दीप प्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले प्राचार्य सौ प्रियदर्शनी सर देसाई यांनी पालक व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शब्दात संबोधित केले. वार्षिक स्नेहसंमेलनाचा उत्साह दोन दिवस चालला. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांची उत्साह आणि आनंदाचे वातावरण होते. आणि शिक्षकांनी घेतलेल्या भिंतीचे प्रदर्शन या भव्य सोहळ्यातून दिसून आले. दुसऱ्या दिवसाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली एका भारतामध्ये अनेक स्वप्नांच्या अविस्मरणी थीम अतुल्य भारत या आधारे सादर करण्यात आली यावेळी मुलांनी संपूर्ण भारताचे दर्शन घडवणारे अतुल्य भारत ही मध्यवर्ती कल्पना नजरेसमोर ठेवून अफलातून नृत्य सादर केले व नृत्य हे कार्यक्रम शाळेने आयोजित केले होते या कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थ्यांनी केले. वार्षिक दिनाच्या समारंभाचा समारोप श्री राजेंद्र जाधव यांच्या आभार प्रदर्शन आणि झाला व ज्यांनी विद्यार्थी शिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने कबुली दिली आणि आदरणीय पाहुण्यांचे अमूल्य वेळ आणि उपस्थित याबद्दल आभार मानले.

# निफाड महाविद्यालयात पत्रकार दीन साजरा




निफाड/प्रतिनिधी : आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त निफाड महाविद्यालयात पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले.

यानिमित्ताने निफाड व परिसरातील सर्व सन्माननीय पत्रकार बंधू यावेळी उपस्थित होते.

प्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पत्रकार राजेंद्र थोरात, राहुल दवते, माणिक देसाई, किशोर सोमवंशी, सागर निकळे, योगेश कर्डिले, राहुल कुलकर्णी, देविदास बैरागी, सुनील क्षीरसागर व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे (डॉ.) सुरेश जाधव उपस्थित होते.

सर्व पत्रकारांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रोफे(डॉ.) सुरेश जाधव यांनी वाचन संस्कृती व ज्ञान यांचा खरा दुवा वृत्तपत्र असल्याचे सांगत समाजाला सर्वतोपरी जागृत व सतर्क ठेवण्याचे कार्य त्यातून होते, लोकशाहीचा चौथा खांब वृत्तपत्र असून याचे खरे शिलेदार सर्व पत्रकार बंधू आहे आणि निफाड पत्रकार संघाचे कार्य हे निष्पक्ष आणि प्रेरणादायी असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सर्व पत्रकाराच्या वतीने माणिक देसाई यांनी आपल्या मनोगतात निफाड महाविद्यालयाचा शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक कार्याचा आलेख हा सतत विकासाच्या दिशेने वाटचाल करणारा असल्याचे सांगत, निफाड महविद्यालच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन डॉ महेश बनकर यांनी केले, कार्यक्रम यशस्वितेतेसाठी डॉ.आर. डी. शिंदे, डॉ.प्रवीण ढेपले, डॉ. सुसान लोरेन्सिया, श्री संजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

**१४ शासकीय कार्यालयातील जवळपास २५ अधिकारी व १६० कर्मचारी सहभागी होणार**

**सर्व विभागप्रमुखांची नियोजन बैठक**

# प्रशासकीय इमारत परिसरात ११ जानेवारी रोजी स्वच्छता मोहीम राबवली जाणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर,(जिमाका) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात जानेवारी २०२५ रोजी राज्यातील सर्व अधिकारी यांना शंभर दिवस उद्दिष्ट प्रति बाबत सात कलमी कार्यक्रम देण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय इमारतीमधील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन आपले कार्यालय व आपला कार्यालय परिसर स्वच्छ ठेवण्याच्या अनुषंगाने जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय येथे सर्व विभाग प्रमुखांची नियोजन बैठक उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोषकुमार देशमुख व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या स्वच्छता नियोजन बैठकीस जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा ग्राहक मंच न्यायालयाचे प्रबंधक प्रशांत तावडे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहसंचालक नलिनी टेंभेकर, नगर भूमापन संचालक गजानन पोळ, भूजलचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉक्टर मुस्ताक शेख, अन्न औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त एस. डी. जिंतूरकर, कृषी विभागाचे तंत्र अधिकारी एस. बी. देशमुख, भूसंपादन क्रमांक ११ चे सहाय्यक महसूल अधिकारी बी. व्ही. वाघ नेहरू युवा केंद्राचे सुभाष चव्हाण, मत्स्य व्यवसाय विभागाचे राजेश पाटील, उपविभागीय अधिकारी सोलापूर ग्रामीण पोलीस निरीक्षक जी. ए. बिराजदार, सरांनी बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता विशाल लेंगरे आदी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी मुख्यमंत्री महोदय यांनी शंभर दिवस उद्दिष्ट पूर्ती च्या अनुषंगाने विभाग कार्यालयाचे वेबसाईट अद्यावत करणे, इज ऑफ लिविंग संकल्पना काम करणे, शासकीय कार्यालय स्वच्छता मोहीम राबवणे, नागरिकांच्या तक्रारी प्रलंबित प्रकरणी निकाली काढणे, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, शासनाच्या महत्त्वाच्या प्रकल्पांना भेटी देणे शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे हा सात कलमी कार्यक्रम राज्यातील सर्व अधिकारी यांना देण्यात आलेला आहे. त्याच पार्श्वभूमीवर या प्रशासकीय इमारतीमधील सर्व शासकीय विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी यांनी एकत्रित येऊन या इमारत परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला असून या अनुषंगाने दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी आठ ते दहा या कालावधीत विशेष स्वच्छता मोहीम राबवली जाणार असून सर्व अधिकारी कर्मचारी यांनी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

या प्रशासकीय इमारतीमध्ये व परिसरात उच्च व तंत्र शिक्षण विभाग जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर ग्रामीण उपविभागीय अधिकारी कार्यालय नगर भूमापन विभाग अन्न औषध प्रशासन नागरी समूह अन्नधान्य वितरण अधिकारी कृषी विभाग मत्स्य व्यवसाय वरिष्ठ भूवैज्ञानिक जिल्हा उपनिबंधक प्रकल्प संचालक निर्वाह केंद्र हे विभाग कार्यरत आहेत. या सर्व कार्यालया अंतर्गत जवळपास २५ अधिकारी व १६० कर्मचारी कामकाज करत आहे. परंतु या इमारत परिसरात खूप अस्वच्छता निर्माण झालेली असून इमारतीमध्ये अस्वच्छता सर्वत्र पसरलेली आहे त्या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुखांनी एकत्रित येऊन सर्वप्रथम आपापले कार्यालय स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

**या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी आठ ते दहा या वेळेत प्रशासकीय इमारत परिसर मोहिमेची स्वच्छता करून करण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व अधिकारी कर्मचारी १००% उपस्थित राहणार आहेत. यापुढील काळात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व चौथ्या शनिवारी परिसर स्वच्छता मोहीम राबविण्याबाबत सर्वांचे एकमत झालेले आहे. परिसर स्वच्छ केल्यानंतर आपापल्या कार्यालयात प्रत्येक विभाग प्रमुखांनी त्यांची कार्यालये स्वच्छ व नीटनेटकी करून घेण्याचे ठरले. तसेच कार्यालयाबाहेर व्यवस्थित स्वच्छता ठेवून कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच आलेल्या नागरिकांची कामे वेळेत व गतीने होतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.**

## थोडक्यात...

### मागील भांडणाच्या रागातून तरुणास मारहाण

सोलापूर : रुबी नगर येथे कामावरून येताना मोटरसायकल आडवून तू तीन वर्षांपूर्वी मला चापट मारला होता, तुला आठवतो का असे बोलून मागील भांडणाचा राग मनात धरून काठीने मारहाण केल्याची घटना आठ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी आकाश दिगंबर आळसंदे (वय ३०, रा. स्कीम नंबर तीन रुबी नगर, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून समर्थ देसाई पूर्ण नाव माहित नाही (रा. गणेश बिल्डर्स स्कीम नंबर ३, जुळे सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी हा कामावरून घराकडे येताना यातील संशयित आरोपी हा फिर्यादीच्या मोटरसायकलवरून आडवून तु मला चापट मारला होता, तुला आठवतो का असे म्हणून मागील भांडणाच्या रागातून काठीने फिर्यादीच्या पाठीवर, डोक्यात मारून व रस्त्यावर पडलेला दगड उचलून फिर्यादीला मारला. यात फिर्यादीच्या डाव्या बाजूला लागून दुखापत झाली आहे. संशयित आरोपीने फिर्यादीस दमदाटी करीत शिवीगाळ केली आहे असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल फुलारी हे करीत आहेत.

### तू आमचे भांडण का सोडवतो असे म्हणून केली मारहाण

सोलापूर : तू आमचे भांडण का सोडवितो,तुझा आमच्याशी काय संबंध आहे. असे म्हणून लाथाबुक्क्यांनी जबरदस्त मारहाण केल्याप्रकरणी व हात फॅक्चर केल्याप्रकरणी चौघा विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेच्या हकीकत असे की,फिर्यादी भारत मन्सावाले (रा.नई जिंदगी रोड,सोलापूर) यांची मुलगी ही बापूजी नगरात राहत असून,तिचा वाढदिवस साजरा करण्यासाठी फिर्यादी हा जात असताना काळभैरव मठाजवळ भारतची चुलत बहीण ज्योती बंबईवाले हिला तिचे सख्खे भाऊ मारहाण करत होते.हे भांडणे सोडवण्यासाठी गेल्यानंतर खेमचंद मन्सावाले,तुकाराम मन्सावाले,माणिक मन्सावाले,लक्ष्मण मन्सावाले (रा.सर्वजण सोलापूर) यांनी मारहाण केली.सदर बझार पोलिस ठाण्यात चौघा विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नदाफ हे करीत आहेत.

# युनिफॉर्म गारमेंट पार्कसोबतच एक कॉमन मार्केटिंग सेंटर उभारा : राज्यपाल राधाकृष्णन्

## आमदार सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली युनिफॉर्म गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : देशातील पहिल्या युनिफॉर्म गारमेंट पार्क सोबतच एक कॉमन मार्केटिंग सेंटर उभारा. आपण स्वतः मुख्यमंत्रीसोबत बैठक लावू आणि आपण प्रयत्न करू असे आश्वासन राज्यपाल सी. पी. राधाकृषणन् यांनी दिले.

राज्यपाल शुक्रवारी सोलापूर दौर्यावर असताना आ. सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी खास सोलापूर मनुफॅक्चरर गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकार्यांची बैठक घेतली. त्यात सोलापूर यूनिफॉर्म गारमेंट उद्योगाबाबत चर्चा केली.

### सोलापूर युनिफॉर्म हब व्हावे

**इतके चांगले युनिफॉर्मचे उत्पादन सोलापुरात आहेत. त्यामुळे सोलापूर युनिफॉर्म हब व्हावे व वेगवेगळ्या दर्जाचे आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील युनिफॉर्म कसे बनवता येईल व त्याचे मार्केटिंग कसे करता येईल, याचा विचार व्हावा, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.**

बेंगलोर येथील युनिफॉर्म गारमेंट फेअरचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. उद्योग वाढीसोबतच त्यातील बारकावे म्हणजे नवीन नवीन टेक्नॉलॉजी आत्मसात करून उत्पादन कसे वाढवता येईल आणि त्याचे विक्री कशी करता येईल यासंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. गारमेंट उद्योगाला लागणार्या स्किल्ड लेबर, आणि मशिन रिपेअर करणारे लेबर तयार करण्याकरिता सोलापूर युनिव्हर्सिटीमध्ये सोलापूर युनिफॉर्म गारमेंट असोसिएशन सोबत टाईप करून त्याचे नियोजन कसे करता येईल यावरही विचार झाला आणि तसे निर्देश त्यांनी जिल्हाधिकार्यांना दिले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सुभाष देशमुख, सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू, प्रताप महानवर



यांच्यासह असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शहा, अमित जैन, प्रकाश पवार, रमेश डाकलिया, वेंकटेश मेंगजी ,रोहन बंकापूर आदी उपस्थित होते.

# स्मशानभूमी नाही गावाला, गाव नुसते नावाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा प्रतिनिधी/ज्ञानेश्वर गुरव : देश स्वातंत्र होऊन सत्याहत्तर वर्ष झालें असतानाही उमरगा तालुक्यातील सुपतगावात अजूनही हक्काच्या अंत्यसंस्कारांसाठी पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने मिळेल त्या जागेवर किंवा गावालगतच्या नाल्यावर अंत्यसंस्कार करावा लागत आहे. मृतदेहांची अवहेलनाच होत आहे.त्यामुळे स्मशानभूमी नाही गावाला, गाव नुसते नावाला, असे म्हणण्याची वेळ सुपतगावावर आली आहे.

या गावची लोकसंख्या तीन हजार असून, या गावात वर्ग १ ते १० पर्यंतची शाळा आहे. परंतु सदर गावामध्ये स्वातंत्र्याची ७७वर्षे उलटूनसुद्धा उघड्यावरच मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागत आहेत.आजतागायत गावकऱ्यांना फक्त आश्वासनेच मिळाली. हक्काची स्मशानभूमी मिळालीच नाही.

ग्रामपंचायत आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे लोकांची मृत्यूनंतरही ससेहोलपट चालू आहे. गावाला स्वतःची स्मशान भूमी नसल्याने पावसाळ्यात अनेक अडचणी येत आहेत, या गावात सार्वजनिक पण स्मशान भूमी नाही, कोणत्याच समाजाची स्मशान भूमी नाही. सुपत गावालगत स्मशानभूमीसाठी सरकारी जागा उपलब्ध नसून, अंत्यविधीसाठी खासगी जागेचा वापर करावा लागतो. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्मशानभूमीसाठी हक्काची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

### स्मशानभूमी नसल्याने कुठेही अंत्यसंस्कार

**स्मशानभूमी नसल्याने गावालगत खासगी जागेत, रस्त्यालगत उघड्यावर खाली जागेत किंवा उन्हाळ्यात गावालगत नाल्यावर अंत्यसंस्कार करावे लागतात. सुपतगावामध्ये एखाद्या व्यक्तिचा मृत्यू झाला तर गावकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशावेळी अनेक मृतदेहांची हेळसांड होत आहे.**

# विज कामगार महासंघाची लातूर परिमंडळ कार्यकारिणी निवड

## अध्यक्षपदी बडे, तर सचिवपदी रत्नपारखी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/ प्रतिनिधी : लातूर येथे बुधवार (दि. ०८) रोजी येथील कार्यालयात महाराष्ट्र विज कामगार महासंघाच्या बैठकीत नूतन पदाधिकारी निवड कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

लातूर परिमंडळाच्या अध्यक्ष पदी नवनाथ बडे , सचिवपदी प्रवीण रत्नपारखी,उपाध्यक्ष पदी वाय. यु, चव्हाण, सहसचिवपदी दिनकर चाटे यांची निवड करण्यात आली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी नारायण गडगडे, प्रदेश संघटन मंत्री सुधाकर माने, बी टी चव्हाण यांच्या उपस्थितीत.




ही लातूर परिमंडळ कार्यकारिणी जाहीर निवड करण्यात आली.

या कार्यक्रमास आनंद लिमकर, विकास गाडेकर, शिवाजी दूधभाते, निलेश भिरंगे, सातय्या स्वामी,अमोल पाटील, श्याम अबाचने, विनोद कुंभार, श्रीराम मुंडे, अशोक मुंडे, पंडित केंद्रे, महादेव नागरगोजे, काका होदाडे, सुंदर अंजनवतीकर, संजय जेऊरकर, सुजाता हेंगणे, हरिदास कोळी, वसंत शिरूर, बशीर शेख, मोहन गुरव यांच्या सह लातूर, बीड, धाराशिव येथील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# खान्दानी मूलगी ...?

ग्रामिण भागात खूप वेळेस वरिष्ट लोकांनकडून मी खान्दानी मूलगी हा शब्द ऐकला होता.. नेमका याचा अर्थ काय असतो ... याचा शोध घेतला तर उत्तर मिळाल संस्कारी .. आई वडीलांची मान कधी खाली न वाकू देणारी .. मग नेमकी कशी तर काहि उदाहरण मिळाले जसे की .. एखाद्या मूलीला एखादा मूलगा लग्नासाठी बघायला अला आणि तो मूलगा तिला नसेल आवडत पण तिच्या घरि मात्र आवडला असेल तर तिने काहि नाहि बोलता होकार ..देने किंवा एखाद्या मूलीला दारूड्या अथवा तिला त्रास देणार घर मिळाल असेल तरी सूद्धा तिने काही आवज न करता तो संसार करने म्हणजे ती खान्दाने .. डोक्यावरचा पदर कधी खाली पडत नाहि म्हणजे ती खान्दानी .. कधी हि कूठे हि कशा विषयी तक्रार न करण म्हणजे खान्दानी .. येवडच नाहि महासत्ताक भारत होण्याच स्वप्न पाहाणारया देशातील काही सूशिक्षित तरूणाकडून ऐकण्यात मिळाल जी मूलगी फेसबूक, व्हाटसप आणि सोशल साईटला नसेल त्या मूलीशी विवाह करणार म्हणजे अशी मूलगी खान्दानी असते .. एका बाजूने आपण नारा द्यायचा स्त्री पूरूष समानता ..पण प्रत्येक्षात आपण हि गोष्ट स्विकारतो का..? जी मूलगी जिन्स अन्यथा तिच्या कपड्यानूसार ती खान्दानि आहे की नाहि अस हि ठरवल जात .. तिला मूलगा मित्र असेल तर तिच्या खान्दानी असण्याचा प्रश्न उभा करतो ... परंतू या सगळ्यात पूरूष दोषी कींवा मूलि अस नाहि पण आपण हे का विसरतो आपण मानव प्राणी आहोत त्यात हि स्त्री एक आहे.. खान्दानी मूलगी.. हे एक स्त्री गूलामीच एक नव लेबल समाजाने लावलेल वाटत ... जर कूणाला खान्दानी मूलगी पाहिजे असेल तर यामध्ये आपण सूद्धा खान्दानी या पात्रतात बसतो का हे नक्कि तपासून पाहाव ...!! खान्दानी आहे का ..?? हे शोधण्यापेक्षा ती एक माणूस म्हणून कशी आहे.. आणि याच बरोबर आपल्यात कीती माणूसकी आहे..खान्दानी लेबल लाऊन स्त्री पूरूष भेदभाव तर नाही करत ना..? जर अस असेल तर तूमच्या शिक्षणाला शून्य अर्थ सूद्धा....नाही..!!! स्वतः पासून एक नवा विचार बदलण्याचा प्रयत्न करू...!!!

**– राणी सूरेश गायकवाड, नाशिक**

# टच संस्थेचा ग्रामीण क्रीडा महोत्सव ५७६ विद्यार्थ्यांच्या सहभागाने उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : टच संस्था प्रस्तुत एकलव्य स्पोर्ट्स अॅकॅडमी आयोजित टच बालग्रामच्या मैदानावर दोन दिवशीय ग्रामीण क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कबड्डी, लंगडी, खो-खो असे सांघिक तर संगीतखुर्ची, धावणे, लांबउडी, सुर्यनमस्कार असे वैयक्तिक खेळ घेण्यात आले. क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन पद्मश्री श्री. उदयजी देशपांडे (सुप्रसिद्ध मल्लखांब पटू) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धावपटू महेश नागवेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनप्रसंगी टच बालग्राम कमिटीचे अध्यक्ष श्री. शैलेंद्र नगरसेठ तसेच रेणूका नगरसेठ, विहीगावचे उपसरपंच दिलीप वारे, करोळचे सरपंच नरेंद्र येले, टच बालग्रामचे प्रकल्प समन्वयक अमोल कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात



आले.

या उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविक करताना कांबळे म्हणाले, टच संस्था ही १९९३-९४ सालापासून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अविरतपणे कार्य करीत आहे टच संस्थेच्या वतीने दरवर्षी ग्रामीण क्रीडा महोत्सवाचे, विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षी सहा व सात जानेवारीला टच बालग्राम येथे ग्रामीण क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून हे क्रीडा स्पर्धेचे सातवे वर्ष आहे. या दोन दिवसीय क्रीडा स्पर्धेत एकूण ५७६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विहीगाव परिसरातील ११ पाडयातील, पालघर मधील २ ठिकाणावरील विद्यार्थी सहभागी झाले होते.

ग्रामीण क्रीडा महोत्सव दोन दिवस चालवण्यात आला. यावेळी पंच म्हणून विविध शाळातील शिक्षकांनी भुमिका पार पाडली. ग्रामीण क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कसारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुरेश गावीत, सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक सुनतकरी, रमेश झाडे, राष्ट्रीय कुस्तीपटू स्नेहा पारिक, बालग्रामचे समिती सदस्य प्रविण बढे स्पर्धा प्रमुख अमोल कांबळे उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गावीत म्हणाले, खेळ आपले आयुष्य घडवत असतात त्यामुळे आपण सर्वांनी अशा खेळांचा सातत्याने सराव करत रहावा. त्यानंतर सर्वप्रथम वैयक्तिक खेळातील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस त्यानंतर सांघिक खेळाचे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी सुत्रसंचालन उमाकांत पांचाळ व किरण छेत्री यांनी केले.

**शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाची अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी**

**पुणे महसूल विभागाच्या कार्याचा महसूल मंत्र्यांनी घेतला आढावा**

# पारदर्शी व गतिमान शासन प्रतिमा निर्मितीसाठी महसूल यंत्रणेने कार्य करावे : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : महसूल खाते शासनाचा चेहरा म्हणून ओळखले जाते. लोकाभिमुख प्रशासनासाठी महसूल यंत्रणेतील जिल्हाधिकारी यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी आठवड्यातील किमान दोन दिवस आपल्या कार्यक्षेत्रात ग्रामीण भागापर्यंत दौरे करावे आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घ्यावा आणि ती प्राधान्याने निर्गत करावी. महसूल यंत्रणेने आपली कार्यपद्धती गतिमान करून तत्परतेने जबाबदारी पार पाडावी ज्यायोगे नागरिकांमध्ये शासनाची पारदर्शी आणि गतिमान शासन अशी प्रतिमा निर्माण होईल असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

पुणे विभागातील महसूल अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, अपर आयुक्त कविता द्विवेदी, अपर आयुक्त समीक्षा चंद्रकार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, अतिरिक्त मुख्य सचिवांचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र मुठे, मंत्रालयातील विशेष कार्य अधिकारी प्रविण महाजन, अरविंद अंतुलीकर, मुद्रांक विभागाचे उपसचिव सत्यनारायण बजाज तसेच विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यावेळी उपस्थित होते.

श्री. बावनकुळे म्हणाले, शासकीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीची व नियमांची नागरिकांना माहिती नसते त्यामुळे त्यांची विविध प्रकरणे शासकीय कार्यालयात प्रलंबित राहतात. शासनाच्या १०० दिवसांच्या महत्वाकांक्षी कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून महसूल यंत्रणेने कालबद्ध मोहिमेद्वारे अशी प्रलंबित प्रकरणे निकाली काढावी. त्यामुळे जनतेमध्ये सकारात्मक संदेश जाईल आणि थकीत महसुलाची वसुली होईल. महसूल यंत्रणेच्या माध्यमातून शासन जनतेपर्यंत पोहोचते.



शासनाचे लोकाभिमुख धोरण जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वांनी एक कुटुंबाच्या भूमिकेतून समन्वय ठेवून काम केले पाहिजे. महसूल यंत्रणेत दाखल प्रकरणांवर मंत्रालय स्तरावर नियमित देखरेख ठेवण्यात येत असल्याने प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत याची जाणीव ठेवावी असे सांगितले.

नवीन वाळू धोरणावर शासन स्तरावर काम सुरू असून देशातील सर्वोत्तम असे सर्वंकष वाळू धोरण अंमलात आणण्यात येणार आहे. नागरिकांना त्यांच्या सोयीच्या नोंदणी कार्यालयात दस्ताची नोंदणी करता यावी यासाठी वन स्टेट वन रजिस्ट्रेशन योजना तयार करण्यात येत आहे अशी माहिती श्री. बावनकुळे यांनी दिली

अधिकाऱ्यांनी महसूल वसुलीचे उद्दिष्ट साध्य करतानाच महसुलात वाढ होण्यासाठी नावीन्यपूर्ण कल्पना सादर कराव्या.

शासनाकडून त्यावर सकारात्मकपणे निर्णय घेण्यात येईल. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सचोटीने काम करून वार्षिक मूल्यमापन अहवाल उत्कृष्ट दर्जाचा ठेवण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. नवीन पदनिर्मिती, पदोन्नती आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अडचणी सोडवण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील. भूसंपादन केलेल्या जमिनींचे कमी जास्त पत्रक तयार करणे व अधिकाराची अभिलेखात नोंद घेणे यास प्राधान्य देण्यात यावे असे निर्देश श्री.बावनकुळे यांनी दिले.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी विभागातील महसूल यंत्रणेच्या कामकाजाची माहिती दिली. शासकीय महसुलाची वसुली, महाराजस्व अभियानांतर्गत केलेली कामे, अर्धन्यायिक प्रकरणे, बळीराजा शेत व पांदन रस्ते योजना, शंभर दिवस कृती आराखडा, गौण खनिजांची महसूल वसुली, ई-म्युटेशनद्वारे फेरफार, ई- चावडी, ग्रीस्टॅक योजना, लोकसेवा हक्क आयोग प्रकरणे, ई-ऑफिस कार्यान्वयन, शेतकरी आत्महत्या विषयक प्रलंबित प्रकरणे, रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादन यासह विविध योजनांची विभागातील सद्यस्थितीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. शासनाच्या शंभर दिवस कृती कार्यक्रमाची विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येऊन उद्दिष्ट साध्य करण्यात येईल. त्यामुळे शासनाची प्रतिमा उच़ावेल आणि सामान्य नागरिकांचे जीवन सुकर होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी यांनी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्र राबविण्यात आलेल्या महसूल विभागाच्या विविध योजनांच्या कार्यपूर्तीची आणि साध्य केलेल्या उद्दिष्टांची माहिती यावेळी दिली.